दुतियो पाठो ।

# सोपाको थेरो ।

सोपाक स्थविर श्रावस्तीमधील दरिद्री मातेचा पुत्र होता. त्याची माता प्रसववेदनांनी दीर्घकाळपर्यंत मूर्च्छितावस्थेत राहिल्याने तिच्या नातलगांनी तिला मृत समजून उत्तरक्रियेसाठी स्मशानात नेले. वादळवारा व पावसाने त्रस्त नातलग उत्तरक्रिया न करताच परत निघून गेले. तेवढ्यात मुलाचा जन्म झाला व त्याची आई तत्काळ मरण पावली. स्मशानपाळाने त्याचे पालनपोषण केले. तो त्याच्या 'सुप्पिय' नावाच्या मुलाबरोबर वाढला. स्मशानपाळाने त्याला दत्तक घेतले. स्मशानात जन्म झाल्यामुळे त्याला 'सोपाक' नाव मिळाले. सोपाक भिक्खुसंघात प्रविष्ट होऊन अर्हत झाले. बुद्धसहवास व बुद्धसंवादाचे वर्णन त्यांनी येथे केले आहे.

---

दिस्वा पासादछायायं, चङ्कमन्तं नरुत्तमं ।
तत्थ नं उपसङ्कम्म, वन्दिस्सं पुरिसुत्तमं ॥१॥

एकंसं चीवरं कत्वा, संहरित्वान पाणयो ।
अनुचङ्कमिस्सं विरजं, सब्बसत्तानमुत्तमं ॥२॥

ततो पञ्हे अपुच्छि मं, पञ्हानं कोविदो विदू ।
अच्छम्भी च अभीतो च, व्याकासि सत्थुनो अहं ॥३॥

विस्सज्जितेसु पञ्हेसु, अनुमोदि तथागतो ।
भिक्खुसङ्घं विलोकेत्वा, इमं मत्थं अभापसथ ॥४॥

लाभा अङ्गानमगधानं, येसायं परिभुञ्जति ।
चीवरं पिण्डपातञ्च, पच्चयं सयनासनं
पच्चुट्ठानञ्च सामीचिं, तेसं लाभा' ति च ब्रवी ॥५॥

अज्जतग्गे' मं सोपाक, दस्सनायोपसङ्कम ।
एसा चे' व ते सोपाक, भवतु उपसम्पदा ॥६॥

जातिया सत्तवस्सोहं, लद्धान उपसम्पदं ।
धारेमि अन्तिम देहं, अहो धम्मसुधम्मता' ति ॥७॥

*(थेरगाथा)*

**सद्दत्थ (शब्दार्थ)**

**दिस्वा** (पूर्वकाळवाचक अव्यय) - पाहून
**पासादछाया** (स्त्री.) - प्रासादाची सावली
**विसज्जित** - प्रश्नांचे दिलेले उत्तर
**व्याकासि** (क्रि.) - स्पष्ट करणे, सांगणे, उत्तर देणे
**चङ्कमन्तं** - चिंतन करीत येरझारा घालताना
**अनुमोदि** (क्रि.) - अनुमोदन केले

**नुरत्तम** (पुं.) - नरश्रेष्ठ
**पुरिसुत्तम** (पुं.) - पुरुषोत्तम
**एकंसं** - एका खांद्यावर
**संहरित्वान** (पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) - एकत्र करून, जोडून
**विरज** (वि.) - निर्मल
**सब्बसत्ततानमुत्तम** (वि.) - सर्व प्राण्यांमध्ये श्रेष्ठ
**भवतु** (क्रि.) - होवो
**उपसम्पदा** (स्त्री.) - भिक्खू-पदाची आजन्म दीक्षा
**अच्छम्भी** (वि.) - अविचल
**अभीत** (वि.) - भयरहित
**धम्मसुधम्मता** - सद्धम्माचा प्रभाव
**विलोकेत्वा** (पूर्वकाळवाचक त्वान्त अव्यय) - मागे वळून पाहून, विलोकन करून
**पिण्डपात** (पुं.) - अन्न
**पच्चय** (पुं.) - प्रत्यय, औषध
**पच्चुट्ठान** (नपुं.) - आदर-सत्कारार्थ उभे राहणे
**सामीचि** (स्त्री.) - योग्य मैत्रीपूर्ण वर्तन
**अज्जतग्गे** - यानंतर, आजपासून पुढे
**कोविद** (वि.) - कुशल, पारंगत
**विदू** - विद्वान
**जातिया** - जन्मापासून
**अन्तिमदेह** (पुं.) - शेवटचा जन्म

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) सोपाक स्थविराचा जीवनवृत्तांत थोडक्यात लिहा.

(२) थेरगाथा ग्रंथाविषयी माहिती लिहा.

**टिपण**

- सामाजिक समता स्थापन करणे आणि समाज-सुधारकांचे कार्य सांगणे.
- समता प्रस्थापित करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करणे.

★★★